जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018
Email ID- rdc1osmanabad@gmail.com

---

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.
2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 02.05.2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 07.05.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दिनांकः- 14/05/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 17 मे 2020 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. यातील मुद्दा क्र. 2 (i) नुसार ग्रीन, ऑरेंज व रेड (हॉटस्पॉट) झोनबाबत स्पष्टीकरण करण्यात आले आहे. तसेच मुद्दा क्र. 2 (ii) नुसार करोना (COVID-19) चा प्रादुर्भाव विचारात घेऊन जिल्ह्यातील रेड झोन (हॉटस्पॉट) व ऑरेंज झोन चा भाग निश्चित करणेबाबत अधिकार देण्यात आला आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यामध्ये करोना विषाणु (COVID-19) चे रुग्ण आढळून आलेले असल्यामुळे, करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता कळंब तालुक्यात नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 व 4 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार करोना विषाणूचा (COVID-19) होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी **उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील खालील आस्थापना वगळून.**

1. शासकीय / निमशासकीय कार्यालये.
2. पिण्याचे पाणी पुरवठा व सांडपाणी निचरा व्यवस्थापन करणा-या आस्थापना.
3. सर्व बँका.
4. दूरध्वनी व इंटरनेट सेवा पुरवठा करणा-या आस्थापना.
5. अन्न, भाजीपाला, दूध



Scanned with CamScanner
Scanned by CamScanner

6. किराणा पुरविणा-या आस्थापना (सकाळी 8 ते दुपारी 2 या कालावधीतच सुरु राहतील)
7. दवाखाने, वैद्यकीय केंद्र व औषधी दुकाने.
8. विद्युत पुरवठा, ऑईल व पेट्रोलियम व ऊर्जा संसाधने.
9. प्रसार माध्यमे, मिडीया.
10. अत्यावश्यक सेवा देणा-या आय. टी. आस्थापना.

**वरील आस्थापना व दुकाने वगळून उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यातील सर्व आस्थापना व दुकाने दिनांक 17 मे, 2020 पर्यंत बंद करणेबाबत आदेशित करीत आहे.**

या आदेशाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प., उस्मानाबाद, पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद, अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद, उपविभागीय अधिकारी कळंब व सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद, तहसिलदार कळंब, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, कळंब, तालुका आरोग्य अधिकारी, कळंब, मुख्याधिकारी नगर परिषद, कळंब, कळंब तालुक्यातील ग्रामसेवक, तलाठी इत्यादींची असेल.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी दिनांक 14.05.2020 पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, उस्मानाबाद.
4. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. विभाग नियंत्रक, रा. प. मंडळ, उस्मानाबाद.
7. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER कळंब
8. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
9. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
10. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER कळंब
11. गट विकास अधिकारी कळंब
12. तालुका आरोग्य अधिकारी, कळंब
13. मुख्याधिकारी नगर परिषद कळंब
14. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

14/5/20
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**



Scanned with CamScanner

Scanned by CamScanner